# जी-२० ने नागपूरच्या सौंदर्यात भर

## मनपा आयुक्त, स्मार्ट सिटी सीईओ, दोन अतिरिक्त आयुक्तांनी दिली प्रशासकीय यंत्रणेला गती

## सरत्या वर्षातील मनपाच्या कार्याचा आढावा

**नागपूर.** आनंद, चैतन्य आणि उमेदीने सुरू झालेले २०२३ हे वर्ष आता मावळतीला आले आहे. या सरत्या वर्षाने अनेक कडू गोड आठवणी आणि चिरकाळ स्मरणात रहाव्यात अशा पाउलखुणा उमटविल्या आहेत. नागपूर शहराची पालकसंस्था म्हणून नागपूर महानगरपालिकेने २०२३ या वर्षात अनेक महत्वाचे निर्णय घेतले, अनेक प्रकल्पांना मूर्तरूप दिले, अनेकांच्या स्वप्नांच्या प्रतिपूर्तीत भूमिका बजावली तर संकटाच्या क्षणी खंबीरपणे साथही दिली. महिला, बेघरांना हक्काचा हात देउन सक्षमीकरणासाठी बळही दिले. नागपूरकर जनतेने देखील या वर्षातील बदलांचा मोठ्या मनाने स्वीकार करतानाच संकटांना तेवढ्याच धैर्याने सामना करण्यास नागपूर महानगरपालिकेला साथ दिली. सरत्या वर्षातील बदल, आव्हाने आणि महत्वपूर्ण कार्यांचा नागपूर महानगरपालिकेद्वारे घेण्यात आलेला आढावा...

### जी-२० शिखर परिषदेच्या निमित्ताने शहराचा कायापालट

२०२३ हे वर्ष भारतासाठी जी-२० शिखर परिषदेचे अध्यक्षपद घेउन आले. यजमपद स्वीकारलेल्या भारतातील वेगवेगळ्या शहरांमध्ये जी-२० शी संबंधित विविध विषयांवरील बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. यातील सी-२० अर्थात सिव्हिल सोसायटी ऑर्गनायजेशनच्या बैठकीची सुरूवात नागपूर शहरातून झाली. केरळ राज्यातील माता अमृतानंदमयी मठाच्या संस्थापिका अमृतानंदमयी ऊर्फ अम्मा यांच्या अध्यक्षतेत २१ आणि २२ मार्च रोजी नागपुरात झालेल्या सी-२० बैठकांच्या आयोजनासाठी नागपूर शहराचे पूर्ण रुपच पालटले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळापासून ते फुटाळा तलाव, तेलंखेडी उद्यानापर्यंत सगळीकडे रोषणाई करण्यात आली होती. ही रोषणाई अनुभवण्यासाठी रात्री उशीरापर्यंत नागपुरकरांची रस्त्यांवर झुंबड उडाली होती. या ऐतिहासिक क्षणांची साक्ष देणारे अनेक स्थायी निर्माणकार्य देखील शहरात झालेले आहेत. जयप्रकाश नगर चौकामध्ये 'वसुधैव कुटुंबकम्'ची साथ देणारे रंगीत कारंजे, सी-२० बैठकांचे स्थान असलेल्या हॉटेल रेडिसन ब्ल्यू पुढील मार्गालगत उभारलेली आकर्षक शिल्पाकृती, अजनी चौकातील क्लॉक टॉवर, कारंजे, अनेक ठिकाणी उभारण्यात आलेले सेल्फी पाईंट आजही शहराच्या सौंदर्यात भर घालत आहेत. शहरातील विविध चौकांमध्ये नागपूर शहराची संस्कृती आणि परंपरा दर्शविणारे आकर्षक देखावे साकारण्यात आले.

### मनपाच्या सन्मानात आणखी दोन पुरस्कारांची भर

२०२३ या वर्षात नागपूर महानगरपालिकेच्या पुरस्कारांच्या यादीत दोन पुरस्कारांची भर पडली. राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शहर सौंदर्यीकरण अभियान राबविण्याबाबत घेण्यात आलेल्या शहर सौंदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धेमध्ये नागपूर महानगरपालिकेने प्रथम क्रमांक प्राप्त केला. राज्य नगर विकास दिनाच्या अनुषंगाने मुंबई येथील कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मनपाचे तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाकृष्णन बी. यांना प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्य शहर सौंदर्यीकरण स्पर्धेत विजेते ठरलेल्या नागपूर महानगरपालिकेला पुरस्कार स्वरूपात १५ कोटी रुपये प्राप्त झाले. तर महाराष्ट्र राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने नागपूर महानगरपालिकेला GeoCivic मालमत्ता कर व्यवस्थापन

प्रणालीसाठी राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १० लक्ष रुपयांचा पुरस्कार मनपाला प्रदान करण्यात आला.

**मनपाचा ३२६७.६३ कोटींचा अर्थसंकल्प**

नागपूर महानगरपालिकेच्या इतिहासातील सर्वात मोठा अर्थसंकल्प २०२३-२४ या आर्थिक वर्षात मांडला गेला. मनपाचे तत्कालीन आयुक्त आणि प्रशासक श्री. राधाकृष्णन बी. यांनी २०२३-२४ या वर्षाचा ३२६७.६३ कोटींचा अर्थसंकल्प मांडला. याशिवाय या वर्षात तिकीट दरात कुठलीही दरवाढ नाही, डिझेल बसेस कमी करून पर्यावरणपूरक ईलेक्ट्रिक बसेसचा अंतर्भाव असलेला परिवहन विभागाचा अर्थसंकल्प तत्कालीन परिवहन व्यवस्थापक श्री. रवींद्र भेलावे यांनी मनपा आयुक्त तथा प्रशासकांना परिवहन विभागाचा अर्थसंकल्प सुपूर्द केला.

**मनपाला मिळाले नवे आयुक्त व अतिरिक्त आयुक्त**

नागपूर महानगरपालिकेला या वर्षात नवीन प्रशासकीय अधिका-यांच्या नेतृत्वाची भेट मिळाली. ३१ जूनला श्री. राधाकृष्णन बी. यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर ४ जुलै रोजी डॉ. अभिजीत चौधरी यांनी नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त आणि प्रशासक म्हणून पदभार स्वीकारला. यानंतर ३१ जुलैला श्रीमती आंचल सूद गोयल यांनी अतिरिक्त आयुक्त (शहर) म्हणून व पुढे काही दिवसांनी डॉ. सुनील लहाने यांनी अतिरिक्त आयुक्त (सामान्य) म्हणून पदभार स्वीकारला. याशिवाय नागपूर स्मार्ट अँड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून श्री. पृथ्वीराज बी.पी. यांनी २६ जुलै रोजी पदाची सूत्रे हाती घेतली. प्रशासनातील दीर्घ अनुभव असलेल्या या अधिका-यांच्या नियुक्तीने मनपाच्या प्रशासकीय यंत्रणेला गती मिळाली आहे.

शहरात उद्भवली पूर परिस्थिती ; लोकप्रतिनिधी, प्रशासन ते नागरिक सर्वांनीच दिला धीर

सरत्या वर्षातील आठवणींमध्ये नागपूर शहरात उद्भवलेली पूर परिस्थिती ही अंगावर शहारे आणणारी घटना म्हणून स्मरणात राहील. २२ सप्टेंबरच्या मध्यरात्री शहरात ढगफुटी सदृश्य पाउस आले व त्यामुळे नाग नदी, पिवळी नदीला मोठा पूर आला. अंबाझरी तलावापासून ते नदी काठावर वसलेले संपूर्ण परिसर प्रभावित झाले. या संपूर्ण परिस्थितीत केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी, राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, मदत व पुनर्वसन मंत्री श्री. अनिल पाटील यांचेकडून वेळोवेळी आढावा घेण्यात आला पुढे बैठक घेउन संपूर्ण परिस्थितीवर दिलासादायक निर्णय देखील घेण्यात आला. तर आमदार चंद्रशेखर बावनकुळे, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जि